खतनियोजन

# मोसंबी फळबागेतील खतांचे व्यवस्थापन

**प्रा. अमोल भुकन**
**प्रा. वैभव वाडेकर**
श्रीश्री मुरलीधर स्वामीजी
उद्यानविद्या महाविद्यालय,
मालेगाव कॅम्प, जि. नाशिक





मोसंबी बागेला वाढीच्या कालावधीत प्रामुख्याने दोन वेळेस खते देणे गरजेचे असते. सुरुवातीचा १ ते ४ वर्षांचा कालावधी पालेदार वाढीचा असतो व दुसरा काळ फळे लागण्याचा असतो. मोसंबीच्या झाडावर वर्षातून तीनदा नवीन पालवी येऊन झाडाची वाढ होत असते. झाडाची चांगली वाढ होण्यासाठी आणि प्रत्येक झाडाला दिलेल्या क्षेत्रात सुरुवातीच्या ३ ते ५ वर्षांत विस्ताराने व्यापण्यासाठी प्रत्येक वाढीच्या सुरुवातीच्या काळात खताची मात्रा देणे आवश्यकता असते.

**मो**संबी पीक हे चवीने आंबटगोड फळ आहे आणि लिंबू वर्गातील एक अत्यंत महत्त्वाचे पीक आहे. महाराष्ट्रामध्ये मोसंबीची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. तसेच पिकाच्या लागवडीमध्ये भारतात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागतो. मोसंबी फळ अतिशय गुणकारी असून त्यामध्ये प्रामुख्याने 'अ', 'ब' आणि 'क' ही जीवनसत्त्वे मोठ्या प्रमाणावर आहेत. शर्करा आणि फॉस्फरसचे प्रमाण अधिक असते. फळातील प्रत्येक भागाचा उपयोग करून ९५% फळावर प्रक्रिया करता येते.

**बागेतील खतांचे नियोजन**

मोसंबी बागेला वाढीच्या कालावधीत प्रामुख्याने दोन वेळेस खते देणे गरजेचे असते. सुरुवातीचा १ ते ४ वर्षांचा कालावधी पालेदार वाढीचा असतो व दुसरा काळ फळे लागण्याचा असतो. मोसंबीच्या झाडावर वर्षातून तीनदा नवीन पालवी येऊन झाडाची वाढ होत असते. झाडाची चांगली वाढ होण्यासाठी आणि प्रत्येक झाडाला दिलेल्या क्षेत्रात सुरुवातीच्या ३ ते ५ वर्षांत विस्ताराने व्यापण्यासाठी प्रत्येक वाढीच्या सुरुवातीच्या काळात खताची मात्रा देणे आवश्यकता असते.



रासायनिक खतांची मात्रा साधारणपणे फेब्रुवारी, जुलै आणि सप्टेंबर या तीन महिन्यांत समान हप्त्यांत विभागून द्यावी. सेंद्रिय खते मात्र पावसाळ्याच्या सुरुवातीस म्हणजे जून– जुलै महिन्यामध्ये द्यावीत.

म.फु.कृ.विद्यापीठ राहुरी शिफारशीनुसार खत व्यवस्थापन तक्ता:

| झाडाचे वय | शेणखत (किलो) | नत्र (ग्रॅम) | स्फुरद (ग्रॅम) | पालाश (ग्रॅम) | निंबोळी पेंड (किलो) |
|---|---|---|---|---|---|
| १ वर्ष | १० | ७५ | ५० | १०० | ०.५ |
| २ वर्षे | १०–१५ | १२५ | ७५ | १५० | १ |
| ३ वर्षे | १०–१५ | २५० | १०० | ३०० | २ |
| ४ वर्षे | १५ –२० | ४०० | १५० | ४०० | ४ |
| ५ वर्षे | २० | ८०० | ३०० | ६०० | १५ |

पाच वर्षांपुढील झाडास नत्र समान हप्त्यात विभागून द्यावे. त्यापैकी नत्राचा अर्धा हप्ता ताण संपल्यानंतर पूर्ण स्फुरदच्या मात्रेसोबत द्यावा आणि उर्वरित नत्राचा अर्धा हप्ता फलधारणेनंतर फळे वाटाण्याएवढ्या आकाराची झाल्यावर द्यावा.

रासायनिक खतांचा वापर करताना जमिनीचा प्रकार व झाडाचे वय लक्षात घ्यावे. शेणखताची कमतरता असल्यास हिरवळीच्या खताचा वापर करावा. यासाठी पावसाळ्यात ताग, मूग, उडीद इत्यादी पिके फुले येण्यापूर्वी जमिनीत गाडावीत. रासायनिक खते झाडाच्या बुंध्यापासून दूर फांद्यांच्या बाहेरील घेराच्या विस्ताराखाली आळेपद्धतीने ७ ते १० सें.मी. खोलीवर द्यावीत.

मार्च व जुलै महिन्यात नवीन पालवी आल्यानंतर झिंक सल्फेट (०.५%) मँगेनीज सल्फेट, मॅग्नेशियम सल्फेट, फेरस सल्फेट (०.३ %) व कॉपर सल्फेट या सूक्ष्म अन्नद्रव्यांची एकत्रित फवारणी करावी. ताण सोडताना आंबवणी– चिंबवणी पद्धतीने ३ ते ४ पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. पाणी दुहेरी (बांगडी) पद्धतीने द्यावे. ■